**प्रेसनोट**

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २९.१२.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचेनाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपींचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) प्रतीक साहेबराव ढवळे, वय २८ वर्षे, कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी, उपकेंद्र नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती, वर्ग ३<br>२) प्रशांत निळकंठ नरोडे, वय २९ वर्षे, रा.शिवणी रसलापूर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती, खाजगी इसम |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक २९.१२.२०२१ चे ११.५० ते १२.०५ वा.दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | १८,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | फुबगांव फाटयाजवळ, नांदगाव खंडेश्वर रोड, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत :** यातील तकारदार हे वहीत करीत असलेल्या शिवणी रसलापूर येथील शेतीसाठी साखळी नदी येथून पाणीपुरवठयासाठी लावलेल्या मोटरपंपाने विज कनेकशन जोडून देणेकरीता म.रा.वि.वि. कंपनी उपकेंद्र नांदगांव खंडेश्वर येथील कनिष्ठ अभियंता श्री.ढवळे व प्रशांत नरोडे, खाजगी इसम हे ३०,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २८.१२.२०२१ रोजी तकार प्राप्त झाली.

सदर तकारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान शिवणी रसलापूर येथील तकारदार हे वहीत करीत असलेल्या शेतीकरीता साखळी नदी येथून पाणीपुरवठयासाठी लावलेल्या मोटरपंपाचे विज कनेकशन जोडून देणेकरीता म.रा.वि.वि.कंपनी उपकेंद्र नांदगांव खंडेश्वर येथील कनिष्ठ अभियंता श्री.ढवळे यांनी १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन प्रशांत नरोडे, खाजगी इसम यांचे मार्फतीने स्विकारण्याचे मान्य केले. तसेच श्री.प्रशांत नरोडे, खाजगी इसम यांची पडताळणी केली असता त्यांनी कनिष्ठ अभियंता श्री.ढवळे यांचेकरीता १५,०००/— रुपये व स्वत:करीता ५,०००/— असे एकुण २०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १८,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक २९.१२.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान श्री. प्रशांत नरोडे यास स्वत:करीता व कनिष्ठ अभियंता श्री.ढवळे यांचेकरीता १८,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे.नांदगांव खंडेश्वर, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र,अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, श्री.एस.एस.भगत, पोलीस उपअधीक्षक, श्री.किशोर म्हसवडे, पोलीस उपअधीक्षक, म.पो.हवा.माधुरी साबळे, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.ना.विनोद कुंजाम, पो.कॉ.अभय वाघ व चालक सपोउनि बारबुद्दे, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तकार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,
टोल फ्रि नंबर—१०६४

29/12/2021

(संजय महाजन)
पोलीस उपअधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner